# प्रकरण दुसरे

## सहकारी शिक्षण प्रशिक्षण - गरज आणि महत्व

१.१ सहकारातील मनुष्यबळ विकास

१.२ सहकारी शिक्षणाची गरज

१.३ सहकारी शिक्षणाची उद्दिष्टये

१.४ सहकारी शिक्षणाचे महत्व

१.५ पाश्चिमात्य देशातील सहकारी शिक्षण

१.६ उपसंहार

१.१ सहकारातील मनुष्यबळ विकास :

भारतासारख्या विकसनशील देशात सहकारी चळवळ देशाच्या आर्थिक विकासासाठी महत्वपूर्ण आहे. ग्रामीण पातळीवर वित्त पुरवठा करणाऱ्या सहकारी संस्थांच्या कार्यकारी मंडळाला तसेच सहकारी बँकेच्या व्यवस्थापनाचे कार्य करणाऱ्या व्यक्तींच्या कार्यक्षमतेमुळे सहकारी चळवळ पुढे जाण्यास मदत झाली आहे.

भारताच्या ग्रामीण भागात सहकारी संस्थांचे जाळे पसरलेले आहे. बदलत्या परिस्थितीनुसार नवीन आव्हाने देशासमोर उभी रहातात. या आव्हानांना तोंड देण्यासाठी व्यवस्थापनात कुशल असणाऱ्या व्यक्तींची फलटण तयार ठेवली पाहिजे तरच सहकारविषयक उद्दिष्टे कार्यक्षमतेने पूर्ण करता येतील.

संस्थेची कार्यक्षमता ही कार्यमग्नता चिकाटी, वाढ आणि यशस्वितेची खात्री या बाबींवर अवलंबून असते.

कोणत्याही व्यावसायिक संघटनेचे यश मनुष्य बळ विकासात आहे. मनुष्यबळ विकासातून कोणत्याही कार्यामध्ये व्यावसायीकरण आणता येते. सहकारात मनुष्यबळ विकासाला अनन्य साधारण महत्त्व आहे. सहकाराची उभी आडवी प्रगती आणि चळवळीने आत्मसात करून घेतलेला ध्येयवाद या दृष्टीने पाहिल्यास सहकारी चळवळीत मनुष्यबळ विकास होणे अगत्याचे आहे. कायदा व्यवहार, व्यवसाय, नियम, तत्त्वे, नीतिमत्ता, सामाजिक व आर्थिक लाभांची कल्पना, सहकारातील अव्यक्त सामर्थ्ये या सर्वांची माहिती सर्वांना असणे आवश्यक आहे.

ज्या राज्यात सहकारी पतसंस्था किंवा इतर सहकारी संस्था कमकुवत आहेत त्या संस्थामध्ये प्रशिक्षित सेवक वर्ग व व्यवस्थापक वर्ग असणे आवश्यक आहे. खाजगी संस्थांच्या व्यवस्थापनापेक्षा सहकारी संस्थांच्या व्यवस्थापनाचे तत्व वेगळे आहे. सहकारी संस्थांचे व्यवस्थापन हे सभासदांनी निवडलेल्या बोर्डामार्फत केले जाते.

सातव्या पंचवार्षिक योजनेत सहकाराच्या व्यवस्थापनेतील परिणामकारकता वाढवण्यासाठी प्रशिक्षण सोयी वाढवण्याकडे लक्ष दिले गेले. प्रत्येक सहकारी संस्थेने व्यवस्थापन, नियोजन, कार्यक्षमता वाढवण्यासाठी मनुष्यबळ विकास करण्यासाठी, सहकारी शिक्षणाच्या माध्यमातून सहकारी संस्थांचा, पर्यायाने देशाचा आर्थिक विकास घडवून आणणे आवश्यक आहे.

कोणत्याही व्यवसायातील गुणवत्ता वाढवण्यासाठी त्या व्यवसायाची मूलतत्वे आत्मसात करणे आवश्यक असते. प्रशिक्षणाने हे साध्य होते. मनुष्यबळ विकासासाठी राज्यस्तरावर, व्यवस्थापकीय स्तरावर व शैक्षणिक स्तरावर प्रयत्न करणे आवश्यक ठरते. कोणत्याही प्रकारच्या विकासासाठी राज्य स्तरावर, राष्ट्र स्तरावर मनुष्यबळ विकास ही एक गरज आहे.

मानवी साधनसामुग्रीचा विकास करण्यात खालील चार घटक मदत करतात.[१]

१) वैयक्तिक गुणविकासासाठी अशा व्यक्तींची आकडेवारी व माहिती जमविणे.
२) प्रशिक्षण कार्यक्रमांचे उदात्तीकरण व योग्य मूल्यमापन करणे.
३) जमविलेल्या सांख्यकीय माहितीवरून विश्लेषण करणे, नियोजन करणे आणि यशस्वीतेकडे वाटचाल करणे.
४) हेतुपूर्वक आखलेल्या योजनांच्या अंमलबजावणीसाठी अशा मनुष्यबळाचा वापर करणे.
५) कार्यक्रमांची परिणामकारकता अजमावणे.

मनुष्यबळाच्या गरजा लक्षात घेऊन त्यांच्या योग्य वापरासाठी प्रशिक्षण संधी वाढविल्या पाहिजेत.

---

१) ले.सी. दिनेश, डॉ.जी. ओझा - ` स्ट्रॅटेजी फॉर ह्यमन रिसोर्स डेव्हलपमेंट इन को-ऑपरेटिव्हज् ` पा.क्र. २९, प्रकाशक वैकुंठ मेहता नॅशनल इन्स्टिटयुट, पुणे.

उत्पादनासाठी असलेल्या साधनसंपत्तीचा योग्य वापर संयोजकाकडून होतो. उत्पादनाच्या घटकावर तो वर्चस्व ठेऊ शकतो. व्यवसायात अथवा व्यापारात मनुष्यबळाच्या विकासामुळे व्यवस्थापन कौशल्याचा विकास होऊ शकतो. त्यामुळे संस्थेची वाटचाल यशस्वी होण्यास मदत होईल.

मानवी साधनसंपत्तीचा विकास म्हणजे कामातील आधुनिकीकरण मानवाचा वैयक्तिक विकास पुढील चार बाबींवर अवलंबून असतो. संभाषण, प्रेरणा, नेतृत्व व समालोचन योग्य संभाषण, योग्य प्रेरणा, योग्य नेतृत्व व योग्य समालोचन या बाबी सहकारी व्यवस्थापनास आवश्यक ठरतात.

व्यवस्थापकाचे सहकारातील महत्व खालील प्रमाणे विशद करता येईल.

सहकारी संस्थेत बरेच कर्मचारी काम करीत असतात. त्या सर्वांनाच संस्थेच्या कामकाजाविषयी पूर्ण माहिती असते असे नाही. सहकारी संस्था यशस्वीरितीने चालवण्यासाठी व्यवस्थापकाची भूमिका महत्वाची असते.

माहिती एकत्र करणे, योग्य मार्गदर्शन करणे, संस्थेची उद्दिष्टे पूर्तता, नवीन कल्पनांवर भर देणे, प्रत्येक व्यक्तीच्या पूर्ण क्षमतेचा वापर करून त्यायोगे संस्थेचा विकास साधणे. कर्मचाऱ्यांच्या अंगभूत गुणांचा विकास घडवून आणणे, त्यांचा अनुभव, शिक्षण इ. चा संस्थेच्या हितासाठी वापर करणे इ. कुशल व्यवस्थापकाची कार्ये सहकारी व्यवस्थापन कौशल्याचे प्रशिक्षण घेतल्यास साध्य होतात.

मनुष्यबळाचे नियोजन म्हणजे मानवी साधनांचा आराखडा तयार करून तो विकसित करणे, नाविन्यता आणणे, आणि त्या योगे संस्थेची उद्दिष्टे गाठणे होय.

सहकारी संस्थेचे नियोजन तयार झाले की, त्या आधारे वाटचाल करणे शक्य होते. गरजेनुसार मनुष्यबळाचा वापर करण्यासाठी नियोजन आवश्यक असते.

भविष्यकाळातील मानवी साधनांची गरज लक्षात घेऊन कुशल कर्मचारी तयार करणे, उत्पादन व्यवस्थेत अचानक बदल झाल्यास त्यावेळच्या अडचणी सोडवणे, अदलाबदलीच्यावेळी अडचणी निर्माण झाल्यास त्या सोडविण्यासाठी राखीव मनुष्यबळ तयार ठेवणे इ. बाबी नियोजनाच्या दृष्टीने महत्वाच्या असतात. तसेच नियोजन करताना वय, लिंग, सद्य:-परिस्थिती, कार्यक्षमता, बढतीची शक्यता, शिक्षण इ. बाबी विचारात घेतल्या जातात.

थोडक्यात मनुष्य ही उपलब्ध साधनांचा विकास करणारी संपत्ती आहे. मानवाच्या अंगभूत गुणांचा विकास करणे, मानवी साधन संपत्तीचा ओघ सहकाराच्या माध्यमातून विकास कार्याकडे वळवणे. सहकारी संस्थामधील व्यवस्थापन, नियोजन परिणामकारकपणे करणे. ही सर्व कार्ये सहकारी शिक्षण आणि प्रशिक्षणाच्या माध्यमातून सुलभतेने होतात.

## १.२ <u>सहकारी शिक्षणाची गरज</u> :

शिक्षणामुळे व्यक्ती आत्मनिर्भर बनते. स्वयंपूर्ण आणि स्वाभिमानाचे जीवन जगण्यासाठी मनुष्याला शिक्षणाची नितांत आवश्यकता असते.

न हि ज्ञानेन सदृशं पवित्रमिह विद्यते ।

या संस्कृत वचनाप्रमाणे ज्ञानार्जन हे पवित्र कार्य आहे. शिक्षणाने मनुष्य सुसंस्कृत बनतो. नव्हे, तो तसा बनायला हवा. सुसंस्कृतपणा हे जीवनाचे एक अविभाज्य अंग आहे, जो शिक्षणाने मिळतो.

ॲडिसनच्या म्हणण्याप्रमाणे,[१] " माणसाचा आत्मा हा ओबड-धोबड हिऱ्याप्रमाणे आहे. त्याला शिक्षणाचे पैलू पाडल्यास तो एखाद्या हिऱ्याप्रमाणे चमकू लागेल."

---

१. शारदा व्ही. - ' थिअरी ऑफ को-ऑपरेशन,' हिमालय पब्लिकेशनमध्ये उल्लेख, १९८६, पा.क्र. १५१.

व्यक्तीच्या बाबतीतच नव्हे, तर संपूर्ण राष्ट्राचा विचार केल्यास शिक्षणाचे महत्व राष्ट्र उभारणीच्या कार्यात असाधारण आहे. राष्ट्रातील साधन संपत्तीचा पुरेपूर वापर करावयाचा झाल्यास व्यक्ती शिक्षित आणि प्रशिक्षित करणे आवश्यक आहे.

वेदकाळामध्येसुध्दा सहकारी वृत्ती अंगी बाणवण्यासाठी ऋग्वेदात खालील ओळींचा आधार घेतला होता.

ओम् सहनौ भुवक्तु । सहवीर्यं करवावहै ।
तेजस्विना वधीतमस्तु । मा विद्विषामहै ।

सहकारी तत्वप्रणालीला प्रोत्साहन देत असताना वरील ओळींमध्ये सहकाराचा मूलमंत्रच सांगितला आहे. तो खालीलप्रमाणे

"सर्वांनी एकत्र भोजन करुया,
सर्वांनी एकत्रितपणे कार्य करुया,
एकमेकांचा द्वेष न करता मनामध्ये
सद्भावनेची वृध्दी करुया."

मानवाच्या जन्मापासूनच सहकाराची त्याला गरज असते. मनुष्य हा समूहप्रिय आहे. म्हणून सर थॉमस अॅलन[3] यानी म्हटल्याप्रमाणे मानवाच्या जडणघडणीमध्ये सहकाराचा सिंहाचा वाटा आहे. सहकाराचे शिक्षण मानवाला शिक्षित, सुसंस्कृत आणि अर्थक्षम बनवायला मदत करते.

सहकारी संस्था आणि सहकारी चळवळ यशस्वी होण्यासाठी सहकारी संस्थेच्या सभासदांना सहकारी कार्यकर्त्यांना, सहकारी संस्थेतील सेवक वर्गाला, अधिकाऱ्यांना, पदाधिकाऱ्यांना, तसेच सर्वसामान्य जनतेला

---

३) माथुर, बी.एस., को-ऑपरेशन इन ईंडिया, तिसरी आवृत्ती, मॉडर्न प्रिंटर्स, आग्रा, १९८६ मध्ये उल्लेख पान ५२२.

सहकारी शिक्षणाची नितांत गरज असते. रॉशडेल सहकारी संस्थेच्या प्रवर्तकांनी सहकारी शिक्षणाचे महत्व, ग्राहक सहकारी संस्थेच्या स्थापनेपासूनच ओळखले होते. त्यांनी सहकारी संस्थेची तत्वे म्हणून ज्या तत्वांचा उल्लेख केला होता, त्यात सहकारी शिक्षणाचे तत्व एक प्रमुख तत्व म्हणून स्वीकारले होते.[४] १८५३ मध्ये त्यांनी तयार केलेल्या नियमाप्रमाणे त्यांच्या संस्थेच्या वाढाव्याच्या २$\frac{१}{२}$ टक्के भाग शिक्षण प्रसारासाठी खर्च करावा अशी तरतूद केली होती. जर्मनीत रायफेशान व शुल्झी डेलिश या प्रकारच्या सहकारी संस्थांच्या नियमावलीत अशाप्रकारच्या खर्चाची तरतुद नव्हती. तरी देखील सहकारी शिक्षण तत्वाकडे दुर्लक्ष केलेले नव्हते. १९३७ च्या आंतरराष्ट्रीय सहकारी तज्ज्ञ समितीने शिक्षणाचे तत्व दुय्यम तत्व मानले होते. तर १९६६ च्या आंतरराष्ट्रीय सहकारी तज्ज्ञ समितीने शिक्षण प्रसाराचे तत्व, एक महत्वाचे तत्व आहे हे मान्य केले होते.

सारांश, सहकारी तत्वप्रणालीच्या विकासासाठी सहकाराची गरज आहे. सहकारी संस्थेचे कामकाज व्यवस्थितपणे चालविण्यास सहकारी शिक्षणाची आवश्यकता आहे.

सहकारी शिक्षणाची गरज अनेक टप्प्यामध्ये महत्वाची आहे. सहकारी चळवळीच्या, प्रारंभीच्या काळात सर्वसामान्य जनतेला सहकाराचे महत्व पटवून देऊन चळवळीत त्याना सामावून घेण्यासाठी सहकारी शिक्षणाची गरज भासली. कारण सहकार सामान्य माणसांसाठी आहे. दुर्बलांसाठी आहे. दुर्बल सर्व दृष्टीने मागासलेले असतात. म्हणून त्यांना लोकप्रबोधनाच्या माध्यमाने बदलवून चळवळीत प्रवाहित करणे आवश्यक असते. जगातल्या अनेक देशामध्ये या पध्दतीने प्रबोधन झाले. भारतातसुध्दा समाजप्रबोधनाच्या लाटेतून सुधारणावाद पुढे आला आणि सहकार हा त्याचा आविष्कार आहे.

----------

४) मोहन सराफ व आचार्य नामा - `सहकार,` प्रकाशक : परिमल जे. शहा, पान क्र. १५७.

भारतामध्ये सहकारी चळवळ ही सरकारी चळवळ बनली आहे अशी टीका होते. यावरून असे दिसून येते की, सहकारी चळवळीच्या प्रचाराचे कार्य शासकीय पातळीवरून हाताळावे लागले. कारण सहकाराचे लाभार्थी स्वत:हून एकत्र येणार नाहीत. चळवळ जसजशी वाढू लागेल, त्या प्रमाणात त्यातील कर्मचा-यांना कार्यकारी सदस्यांना प्रशासकीय प्रशिक्षणाची गरज निर्माण होते. या शिवाय सहकारी चळवळी बाहेरचे जे लोक आहेत त्यांनाही सहकारी चळवळीची गुणवत्ता वाढविण्याच्या दृष्टिकोनातून शिक्षण प्रसार, प्रशिक्षणाची गरज निर्माण होते. ते सहकारी शिक्षणाच्या माध्यमातून दिले जाते.

सहकारी शिक्षणामुळे चळवळीची कार्यक्षमता कार्यदक्षता आणि कार्यक्रम वृध्दिंगत होतात आणि सामान्यांचे कल्याण साध्य होते.

१.३ <u>सहकारी शिक्षणाची उद्दिष्टे</u> :

सहकारी शिक्षणाची सर्वमान्य उद्दिष्टे खालील प्रमाणे आहेत :

१. <u>सहकारी तत्वाचा प्रसार करणे</u> -

लोकांना सहकारी तत्वाची माहिती नसते. त्याचे फायदे काय आहेत याचेही ज्ञान नसते. सभासदांनी एकत्र का यावे ? त्यांनी कोणती तत्वे आचरणात आणावीत ? कोणत्या तत्वांचे पालन केले असता सहकारी संस्था यशस्वी होऊ शकते ? याची त्यांना पूर्ण माहिती नसते. सभासद आणि बिगर सभासद व्यक्ती शिक्षित करणे हे सहकारी शिक्षणाचे उद्दिष्ट असते.

२. <u>जागरूक सभासद वर्ग तयार करणे</u> -

सहकारी शिक्षणाद्वारे सभासदांना सहकारी संस्थेच्या कार्यपध्दतींची माहिती करून देता येते. कार्यपध्दतीतील दोष टाळून सहकारी संस्थेवर कोणकोणत्या मार्गांनी नियंत्रण ठेवावे याचे शिक्षण देता येते.

या पध्दतीमुळे प्रत्येक सभासद सहकारी संस्थेच्या व्यवस्थापनावर व कार्यावर योग्य प्रकारे नियंत्रण ठेवू शकतो. जागरूक सभासद वर्ग निर्माण करणे हे सहकारी शिक्षणाचे महत्वाचे कार्य आहे.

३. सहकारी शिक्षण ग्रामीण भागात
नेतृत्व करण्यास मदत करते -

सहकारी संस्थेची स्थापना कशी करावी ? संचालकांची निवड कशी करावी ? संचालक मंडळ, अध्यक्ष यांची कार्ये व जबाबदाऱ्या यांची माहिती सहकारी शिक्षणामुळे मिळते. स्वत:ची आर्थिक प्रगती करण्याबरोबरच सहकारी शिक्षणामुळे समाजाची आर्थिक प्रगती होते.

४. सामाजिक व आर्थिक परिवर्तन घडविणे -

सामाजिक आर्थिक परिवर्तन घडवून आणण्याच्या कामी सहकारी शिक्षण व प्रशिक्षण मोलाची कामगिरी बजावते. भांडवलदारांपासून आर्थिक हितरक्षण करण्यासाठी सहकारी शिक्षणाची मदत होते.

५. अपप्रवृत्तीला आळा बसविणे -

व्यापार, कर्ज व्यवहार उत्पादन या सारख्या संस्थांमधून अपप्रवृत्तीला आळा बसावा या हेतूने सहकारी संस्था चालविल्या जातात. दुर्बल घटकांच्या आर्थिक हितरक्षणासाठी समाजातील गैरव्यवहार टाळणे हेही सहकारी शिक्षणाचे उद्दिष्ट आहेत.

६. संघटन दृष्टिकोन तयार करणे -

समाजात संघटन दृष्टिकोन तयार करणे, परस्पर सहाय्यातून स्वसहाय्य हे तत्व आचरण्याची क्षमता सहकारी शिक्षणामुळे येते. निसर्गत: मानव हा समूहप्रिय प्राणी आहे. त्याच्या अंगभूत गुणांना सहकारी शिक्षणामुळे प्रोत्साहन मिळते.

७. <u>जबाबदार नागरिक बनविणे</u> -

जबाबदार नागरिक बनविण्यासाठी सहकारी शिक्षण व प्रशिक्षण उपयुक्त ठरते. अलिकडे जबाबदार नागरिक तयार करणे आवश्यक आहे.

८. <u>प्रशिक्षण देणे</u> -

सहकारी संस्था चालविण्याकरिता आवश्यक असणारे प्रशिक्षण सहकारी संस्थेतील अधिकाऱ्यांना सेवकांना देऊन त्यांची कार्यक्षमता सहकारी शिक्षणामुळे वाढवता येते.

९. <u>जागरूक महिला निर्माण करणे</u> -

सहकारी शिक्षणामुळे महिला अधिक जागरूक रहातात. महिलांना गृहस्वामिनी असे संबोधले जाते. घरातील मुलींना व मुलांना सहकारी तत्वांची माहिती देणे, घरात सहकार्याचे वातावरण निर्माण करणे, अशा सारखी कामे सहकारी शिक्षणामुळे सुलभ होतात. सहकारी चळवळीचा प्रसार सुलभतेने करण्यासाठी स्त्रियांची मोठ्या प्रमाणात मदत होते. ग्राहक सहकारी, भांडारे, हॉटेल व्यवसाय, लघुउद्योग, अपंगांना स्वावलंबी बनवणारे उद्योग, या सारख्या विस्तृत क्षेत्रामध्ये शिक्षित स्त्रिया सहकाराच्या माध्यमातून कुटुंबाचा पर्यायाने देशाचा आर्थिक विकास घडवून आणतात म्हणून महिलांना सहकारी शिक्षण देणे आवश्यक ठरते.

१०) <u>युवा जागृती करणे</u> -

सहकारी तत्वप्रणाली युवकांमध्ये रुजावी, वाढावी म्हणून शाळा, महाविद्यालये यातून सहकाराचे शिक्षण दिले जाते. भावी काळातील समाजाचे आधारस्तंभ बळकट करण्यासाठी सहकारी शिक्षण व प्रशिक्षण आवश्यक आहे.

थोडक्यात, सहकारी शिक्षण हे दुधारी शस्त्र आहे. त्याचा योग्य वापर व्हायला हवा.[५]

---

५) कुलकर्णी के.आर. - 'को-ऑपरेशन इन इंडिया अॅन्ड अब्रॉड,' व्ही. व्ही. बापट, व्हाल्यूम नं.१, १९५५, पा.क्र. ४७७.

१.४ <u>सहकारी शिक्षणाचे महत्व</u> :

सहकारी संस्थांनी सहकारी शिक्षणाला महत्वाचे स्थान दिले आहे. शिक्षण हे सहकाराच्या विकासाचे अविभाज्य अंग आहे.

१) दुर्बल घटकांच्या आर्थिक हितरक्षणासाठी सहकारी संस्था स्थापन केल्या जातात. कर्जाची परतफेड नियमित करावी, आवश्यक वस्तूंची खरेदी सहकारी संस्थेतूनच करावी, संस्थेच्या कार्यात लक्ष द्यावे, यासाठी प्रत्येक सभासदाला सहकारी शिक्षण महत्वाचे आहे.

२) सहकारी संस्था विशिष्ट कार्यानुरूप स्थापन झालेल्या असतात. त्याचा संबंध प्रत्येक सभासद संस्थेच्या कार्याशी निगडीत असतो. मांडवलदार, व्यापारी यापासून होणारी पिळवणूक थांबवण्यासाठी आर्थिक, सामाजिक, व्यवहारिक शिक्षण सहकारी संस्थेमार्फत मिळू शकते. सभासदांच्या ज्ञानाच्या कक्षा सहकारी शिक्षणामुळे रुंदावतात.

३) सहकाराचे शिक्षण मिळाल्याने सभासदांना मिळणारा आर्थिक फायदा, समाजाला होणारा फायदा इ. बाबी समजू शकतात. सभासदांचा सहकारी संस्थावरील विश्वास दृढ होण्यास मदत होते.

४) सहकारी संस्थेचे सभासद हे एका बाजूने सहकारी संस्थेचे मालक असतात तर दुसऱ्या बाजूने ते सहकारी संस्थेचे ग्राहक असतात. सहकारी शिक्षणामुळे सहकारी संस्थेचा कारभार कार्यक्षम होण्यास दुहेरी मदत होते.

५) सहकारी संस्थेच्या पदाधिकाऱ्यांना सहकारी संस्थेच्या कार्याबद्दल, धोरणाबद्दल, सहकारी कायद्यांबाबत, कचेरीतील कार्यपध्दतीबाबत शिक्षण व प्रशिक्षण देणे आवश्यक ठरते. सर्वसाधारणपणे सहकारी संस्थेची स्थापना समाजाच्या दुर्बल घटकाकडून किंवा मध्यम वर्गीयांकडून होते. संस्थेचे संचालक त्यातूनच निवडले जातात. संस्थेचे संचालक, म्हणून कार्य

करण्यासाठी आवश्यक असणारे शिक्षण त्यांना मिळालेले नसते. संचालकांचे अधिकार कायदे इ. बाबत पूर्ण माहिती नसते.

६) मॅडिसनच्या म्हणण्याप्रमाणे[६] " सहकारी शिक्षण व प्रशिक्षण नसणाऱ्या लोकांच्या हाती सहकारी चळवळ सोपविणे ही शोकांतिका आहे किंवा हास्यास्पद बाब आहे." या दृष्टीने सहकारी शिक्षणाचे महत्व वाढते.

७) सहकारी संस्थांची निकोप वाढ होण्यासाठी सहकारी शिक्षण आवश्यक ठरते. सहकारी संस्थामार्फत ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना कर्ज पुरवठा करणे, शेतमालाची विक्री करणे, त्यांना खते, अवजारे पुरवणे, जीवनावश्यक वस्तुंचा पुरवठा करणे, इ. गोष्टी सर्वांना माहित होतात. स्थानिक व्यक्तींचा सहकारात सहभाग असल्यास अशा व्यक्तींना शिक्षित आणि प्रशिक्षित करणे आवश्यक ठरते.

८) सहकारी शिक्षणामुळे संस्थेतील गैरव्यवहारांना आळा बसतो.

सारांश, सहकारी शिक्षणामुळे सहकारी संस्था, सभासद, अधिकारी, कर्मचारी, यामध्ये सुसंवाद साधण्याचा प्रयत्न केला जातो आणि म्हणूनच सहकारी शिक्षण महत्वाचे आहे,

## १.५ पाश्चिमात्य देशातील सहकारी शिक्षण :

पाश्चिमात्य देशातील सहकारी क्षेत्रामध्ये सहकार व शिक्षणाला प्रशिक्षणाला नेहमीच महत्वपूर्ण स्थान देण्यात आलेले आहे. इंग्लंडमध्ये १८६९ मध्ये किरकोळ व्यापारासाठी सहकारी संस्था स्थापन करण्यापूर्वी सहकारी शिक्षणाची तरतूद केली होती.

----------

६) सराफ, आचार्य, पूर्वोक्त, पा.क्र. १५९ मध्ये उल्लेख.

ब्रिटीश सहकारी शिक्षणाचे प्रणेते रॉशडेल पायोनियर्स यांनी १८५४ मध्ये श्रमिकांसाठी महाविद्यालय काढलेले होते.[७] अर्थशास्त्र, तत्वज्ञान व सहकार या विषयांचे शिक्षण येथे मिळत असे. १८६९ मध्ये सहकारी संस्थेच्या सभासदांना व अधिकाऱ्यांना शिक्षण व प्रशिक्षण देण्यासाठी को-ऑपरेटिव्ह युनियनची स्थापना केली गेली.

पश्चिम जर्मनीमध्ये सहकारी[८] शिक्षण व प्रशिक्षणासाठी मध्यवर्ती सरकारचा सहभाग नव्हता तरीही संबंधित सहकारी संस्थानीच ती सोय केलेली होती.

पश्चिम कॅनडामध्ये सहकारी संस्थांच्या अधिकाऱ्यांना प्रशिक्षण देण्यासाठी संपूर्ण देशामध्ये महाविद्यालये स्थापन केली आहेत. जपानी सहकार तज्ज्ञांच्या मते, दुर्बल सहकारी संस्थांचे इतर सक्षम सहकारी संस्थामध्ये विलीनीकरण करू नये तर त्यामध्ये सुधारणा घडवून आणण्यासाठी शिक्षक पाठवावेत. डेन्मार्कमध्ये डॅनिश सहकारी कॉलेजची स्थापना १९३२ मध्ये झाली. स्वीडनमध्ये १८९९ साली स्वीडिश सहकारी संस्थेद्वारे धाऊक सहकारी संस्थेतील कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्याची व्यवस्था केली होती.[९]

डब्ल्यु.पी. वॅटकीन यांच्या मते "सहकार म्हणजे शैक्षणिक कार्यक्रम राबविणारी आर्थिक चळवळ होय." यावरून सहकारातील शिक्षणाचे महत्व लक्षात येते.

---------

७) कामत, गो.स. - 'सहकार तत्वे आणि व्यवस्थापन,' १९७६.

८) माथुर बी.एस., पूर्वोक्त, पा.क्र. ५२३ मध्ये उल्लेख.

९) रायखेलकर, ए.आर. आणि डांगे ए.जी., 'सहकार तत्वे व व्यवहार,' पा.क्र. ६४.

डॉ.जी. कर्वे यांच्या मते, ` सहकारी शिक्षण दुय्यम किंवा आर्थिक ठरविणे म्हणजे सहकारी चळवळीचे यश संपुष्टात आणणे आहे. १९१५ मध्ये मॅकलान कमिटीने देखील सहकारी संस्थेच्या नोंदणीपूर्वी व नंतर सभासदांना शिक्षण व प्रशिक्षण देण्याची आवश्यकता व्यक्त केली आहे.[१०]

फिलिपाईन्समधील सहकारी चळवळीच्या अपयशाबद्दल बोलताना मि. क्लेमेंट म्हणतात, ` सहकारी चळवळीच्या व्यवहाराबद्दल अपुरी माहिती व मार्गदर्शन हे सहकारी संस्थेच्या अयशस्वितेचे प्रमुख कारण आहे.

१.६ <u>उपसंहार</u> :

सारांश सहकारी शिक्षणामुळे समाज सक्षम बनण्यास मदत होते. सहकारी तत्वांची जाण असल्यामुळे सहकारी संस्था यशस्वीपणे प्रशासित करणे शक्य होते.

सर्वसामान्य जनता, सभागृह, कार्यकारी मंडळ, कर्मचारी, अधिकारी वर्ग या सर्वांना सहकाराचे शिक्षण व प्रशिक्षण योग्य त-हेने दिल्यास सहकारी चळवळ यशस्वी होण्यास कोणतीच हरकत नाही. किंबहुना भौतिक विकासातील उपक्रमापेक्षा मनुष्यबळ विकास अधिक संयुक्तिक आहे. दुर्दैवाने भारतासारख्या विकसनशिल देशामध्ये मनुष्यबळ विकासाचे प्रयत्न म्हणावे तसे गुणवत्तेचे नाहीत. यामुळेच सहकारातील अनिष्ट प्रवृत्ती, नीतिमत्ता, स्वाह:कार वगैरे वृध्दीस लागले. यामुळे चळवळ बदनाम होते. ` सहकार फसले ` कारण सहकारी शिक्षण योग्य पध्दतीने , योग्य त-हेने दिले गेले नाही. पण ` ते ` यशस्वी व्हायचे असेल तर सहकारी शिक्षण अपरिहार्य आहे.

---------

१०) तथोक्त, पा.क्र. ७१.

या बाबतीत मा. तात्यासाहेब कोरे यांनी दिनांक ३० सप्टेंबर, १९९१ रोजी वारणानगर येथे काढलेले उद्‌गार महत्वाचे वाटतात.

" सहकार हा स्वाहाकार व्हायला नको असेल तर या क्षेत्रातील कार्यकर्त्यावर संस्कार करणे कार्यकर्त्यांची शिबिरे घेणे यांची आवश्यकता आहे."

—x—x—x—x—x—